पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
E.Mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in

---

# प्रेसनोट

दिनांक :- ०८/०१/२०२२

## देहरेवाडी, ता.दिंडोरी येथील घटनेतील आरोपीस दिंडोरी पोलीसांनी १२ तासात घेतले ताब्यात

---

दिनांक ०७/०१/२०२१ रोजी दिंडोरी पोलीस ठाणे हद्दीत देहरेवाडी शिवारात काकडदरा जंगलात एक ०६ वर्षाची मुलगी ही गळफास घेतलेले बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने पोलीस ठाणेस मिळालेल्या खबरीवरून सदर मुलीस सिव्हील हॉस्पिटल नाशिक येथे दाखल करण्यात आले होते.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री.सचिन पाटील यांनी सदर घटनेबाबत तात्काळ दखल घेवुन पिडित मुलगी हिची सिव्हील हॉस्पिटल येथे भेट घेवुन दिंडोरी पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी यांना सदर घटनेचा सखोल तपास करून आरोपीस अटक करणेबाबत मार्गदर्शन करून सुचना दिल्या. त्यानुसार दिंडोरी पोलीसांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी करून पिडीत मुलीबाबत सविस्तर माहिती घेतली, सदर मुलगी ही मुंगसरा जिल्हा परिषद शाळेत गेली असता, तिस कोणीतरी अज्ञात इसमाने काहीतरी कारणाची फुस लावुन तिस जिवे मारण्याचे उद्देशाने देहरेवाडी शिवारात काकडदरा जंगलात आणुन तिस नायलॉन दो-याने गळफास लावण्याचा प्रयत्न केला होता. सदर घटनेबाबत दिंडोरी पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी यांनी सखोल तपास करून आरोपी तिचे वडिलच नामे रामु धनगरे, रा. ओझरखेड, ता.त्रंबकेश्वर, ह.मु.मुंगसरे, ता.जि.नाशिक यास ताब्यात घेवुन दिंडोरी ठाणेस भादवि कलम ३६४,३०७,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मा.पोलीस अधीक्षक श्री.सचिन पाटील यांचे मार्गदर्शनानुसार दिंडोरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद वाघ हे करीत आहे.

सदर कारवाईत नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. सचिन पाटील यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे दिंडोरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ, सपोनि लोखंडे, पोउनि कावळे, मपोउनि जिजोट, सपोउनि वाघेरे, पोना खांडवी, शिलावटे, पानसरे, पोकॉ राठोड यांनी आरोपीस १२ तासात अटक करून कामगिरी केली आहे.